# घटक ३ – कथा साहित्यप्रकार

## १८१८ ते १९२० या कालखंडातील कथा वाङमयाचा आढावा घ्या.

गोष्ट सांगण्याची व ऐकण्याची आवड मानवी मनात फार प्राचीन काळापासून रूजली आहे. जसा मानवी मनाचा विकास झाला तसा त्याच्या या गोष्ट ऐकण्याच्या आवडीचाही विकास झाला. प्राचीन काळापासून मौखिक परंपरेतील लोककथांचे स्थान समाजजीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे. कथा निर्मितीचा विचार करिता प्रथम महानुभाव संप्रदायातील चक्रधरस्वामींचे दृष्टांत सांगणाऱ्या कथांनी पुढे शिवकालात व पेशवेकालात बखरींचे रूप धारण केले.

### १८१८ ते १८७४ या कालखंडातील कथा –

इंग्रजी राजवटीबरोबर छापण्याची कला भारतात आली आणि मराठी गद्याला नवे वळण लागले. मराठीतून ग्रंथलेखन होऊ लागले. परिणामी मराठी कथालेखनाच्या प्रवृत्तीलाही जोर चढला. सुरूवातीचे कथा वाङमय सर्व भाषांतरात्मक होते. इंग्रजी, संस्कृत व बंगाली भाषेतील निवडक कथांची मराठीत भाषांतरे झाली.

### भाषांतरात्मक कथा –

आधुनिक मराठीतील पहिली कथा इ.स. १८०६ मध्ये तामिळनाडू राज्यातील तंजावर येथील छत्रपती शिवाजी राजे यांचे वंशज सरफोजी राजे यांनी त्यांच्या दरबारातील 'सखखन पंडित' यांच्या मदतीने इसापनीतीचे भाषांतर करून ती 'बालबोध मुक्तावली' या नावाने छापली. ही मराठीतील पहिली छापील कथा होय.

डॉ. विल्यम कॅरी यांनी पंडित वैजनाथ यांच्याकडून 'सिंहासन बत्तिशी, पंचतंत्र, हितोपदेश,' या संस्कृत गोष्टीरूप ग्रंथांची मराठीत भाषांतरे करून छापली. तर सदाशिव काशीनाथ छत्रे यांनी 'बालमित्र – १, इसापनीती, वेताळपंचविशी, ही भाषांतरात्मक कथेची पुस्तके छापून प्रसिद्ध केली.

याशिवाय बकासूराची बखर, चंद्रहाराची बखर, नलराजाची बखर यासारख्या पौराणिक गोष्टी सारांशरूपाने सांगणाऱ्या छोटया छोटया गोष्टी प्रसिद्ध झाल्या. भोजराजा व कालिदास, बिरबल व बादशहा अशा जोडया निर्माण करून त्यांच्या चातुर्याच्या कथा लिहिल्या गेल्या.

### अरेबियन नाईट्स –

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी अरेबियन नाईट्स मधील कथांचे मराठीकरण १८६१ ते १८६५च्या दरम्यान केले. स्त्री चारित्र्याच्या संशयाने पछाडलेला बादशहा दर दिवशी एका तरूणीशी 'निकाह' लावून तिला जिवे मारत असे. यावर एक चतूर प्रधानकन्या शक्कल लढवते. पहिल्या राजी ती बादशहाला त्याचे मनोरंजन करण्यासाठी एक कथा सांगते. बादशहाला ती कथा इतकी आवडते की तिने आणखी कथा सांगाव्यात असे तो फर्मावतो. ती प्रधानकन्या मागील कथेचे सूत्र पकडून पुढील कथा सांगते. एका कथेतून अनेक कथा निर्माण होतात आणि प्रधानकन्येचे मरण पुढे पुढे ढकलले जाऊन अंती टळते. या मुळ कथांना धक्का लागू न देता हे भाषांतर चिपळूणकरांनी इतक्या कौशल्याने केले आहे की या कथा आपल्याच वाटतात. यातील 'सिंदबाद खलाशी, अलीबाबा आणि चाळीस चोर' यासारख्या कथा सुपरिचित आहेत. तसेच त्यांनी 'हातीमताई' या नावानेही कथेचे पुस्तक छापून प्रसिद्ध केले आहे.

### मोरोबा कान्होबा विजयकर यांचे घाशीराम कोतवाल –

मोरोबा कान्होबा विजयकर यांनी १८६३ साली 'घाशीराम कोतवाल' नावाचा ग्रंथ लिहिला असून यातील २८ प्रकरणात स्वतंत्र विषय आले आहेत. प्रत्येक प्रकरणाचा परस्परांशी संबंध नाही. एकाच व्यक्तीला केंद्रवर्ती ठेऊन तिच्या भोवती वेगवेगळया गोष्टी गुंफून साखळी पद्धतीने या कथा एकत्र गुंफल्या आहेत. उदा.

आळंदीची यात्रा, उष्ण पाण्याचे झरे, दुर्बिणीचा इतिहास इ. याशिवाय वि.स.नवलकरांनी 'गुलाबकावली', चिंतामणी दिक्षितांनी 'विदग्धशास्त्री चरित्र' तर गोविंद भार्लेकरांनी 'चातुर्यकथा' मराठीत भाषांतरीत केली.

अशा प्रकारे पूर्वार्धात शालोपयोगी गोष्टी लिहिण्याकडे व उत्तरार्धात फारशी, अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टींची भाषांतरे व त्यांचे अनुकरण करण्याकडे कल वाढला. त्यामुळे हा सारा कालखंड अद्‌भुततेने व कल्पनारम्यतेने नटलेला आढळतो. या सर्व कथांचे स्वरूप रंजनपर, माहितीपर, बोधपर असे होते. मात्र ही परिस्थिती असली तरी या कथांनी पुढील लघुकथा आगमनासाठीचे आवश्यक वातावरण निर्माण केले. हे या कालखंढातील कथासाहित्याचे योगदान म्हणावे लागेल.

## १८७४ ते १९२० या कालखंडातील कथा वाङमय –

### हरिभाऊ आपटे यांचे कथालेखन –

या कालखंडातील कथा वाङमय प्रामुख्याने हरिभाऊ आपटे यांच्या कथा वाङमयाने समृद्ध केले. त्यांना मराठी कथेचे जनक म्हटले जाते किंबहुना या कालखंडाला हरिभाऊ आपटे कालखंड असे म्हणतात.

**'करमणूक पत्र' –**

२५ ऑक्टोबर १८९० रोजी हरिभाऊंनी करमणूक नावाचे साप्ताहिक सुरू केले. 'लहानापासून थोरांपर्यंत सर्व स्त्री पुरूषांचे मनोरंजन करून ज्ञानदान देणारे पत्र' अशा हेतूने हरिभाऊंनी हे साप्ताहिक काढले. या साप्ताहिकाच्या अंतरंगात आळीपाळीने दोन मोठाल्या गोष्टी, पदार्थ विज्ञान, रसायन, अर्थ इ. शास्त्रांचे ज्ञान करून देणा–या गोष्टी, नाटके थोर पुरूषांची चरित्रे, कविता, चुलीपासल्या गोष्टी असतील असे त्यांनी पहिल्या अंकात छापून प्रसिद्ध केले. हे साप्ताहिक १९१७ साली बंद पडले.

**हरिभाऊ आपटे यांच्या स्फुट गोष्टी –**

'करमणूक' साप्ताहिकाच्या माध्यमातून हरिभाऊंनी मराठी कथेला अद्‌भुताच्या व अवास्तवाच्या तावडीतून सोडवून वास्तवाच्या सृष्टींत आणण्याचे कार्य केले. त्यांच्या **एकूण कथांची संख्या १ हजाराच्या आसपास** असून आज मात्र त्यातील खूप कमी कथा उपलब्ध आहेत. त्यांच्या उपलब्ध कथा 'स्फुट गोष्टी भाग १ ते ४' या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. याखेरीज 'चाणाक्षपणाचा कळस', 'फ्रेंच रहस्यकथेवर आधारित कथासंग्रह' आणि 'घटकाभर करमणूक' हे त्यांचे कथासंग्रहही प्रसिद्ध आहेत.

'अपकाराची फेड उपकारानी, काळ तर मोठा कठीण आला, थोडया चुकीचा घोर परिणाम, कसे दिवस गेले' या त्यांच्या दीर्घकथा म्हणजे छोटया छोटया कादंबऱ्याच आहेत. या कथांमध्ये प्रसंगांची गर्दी आणि वर्णनाचा पाल्हाळ आहे. '**नीतिबोध**' हा हरिभाऊंच्या कथेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मानवी आचारधर्म सांगणाऱ्या या कथांचे स्वरूप उपदेशक होते. सामाजिक सुधारणेला वाहिलेली एकच गोष्ट त्यांनी लिहिली ती म्हणजे 'दुर्गाताईची ओवाळणी'. या कथेत केशवपनाचे स्वप्नमय चित्र रेखाटून त्या कृत्याबद्दल चीड आणण्याचा प्रयत्न केला आहे. **'काळ तर मोठा कठीण आला'** ही एकमेव कथा ग्रामीण जीवनावर लिहिलेली असून दुष्काळामुळे एक गरीब शेतकरी कुटुंब कसे उद्ध्वस्त होते हे मोठया गांभिर्याने सांगितले आहे. वास्तवता, भावोत्कटता व बोधप्रधान दृष्टिकोन त्यांच्या कथेतून दिसून येतो.

हरिभाऊंच्या विनोदी व कौटुंबिक कथांचा विचार करताना त्यांनी मानवी जीवनाच्या विसंगतीवर आधारित अनेक गोष्टी लिहिल्या आहेत. 'डिस्पेशिया' या कथेतील काल्पनिक आजाराने पछाडलेला कृष्णराव अथवा अकारण घरातील सर्व मंडळींवर खेकसणाऱ्या वामनरावांप्रमाणे अनेक विक्षिप्त व्यक्ती त्यांनी वाचकांसमोर उभ्या केल्या. 'आजीबाईची गोष्ट' मधील आप्पा कुलकर्णी, 'लंबोदराची तिरपाट' मधील चिक्कणमामा अशा कितीतरी वैशिष्टयपूर्ण व्यकितरेखा रेखाटून त्यांनी विनोदनिर्मिती केली आहे.

कौटुंबिक जीवनाचे वास्तव चित्रण करून त्यातील समस्या वाचकांपुढे उभ्या करणे व त्यामधून काही बोध करणे हे हरिभाऊंच्या कथालेखनामागील उद्दिष्ट दिसून येते. उदा. 'प्रामाणिकपणा फळास आला', प्रेम की पैसा, आनंदच आनंद, घरजावई' अशा अनेक कथांमधून त्यांनी मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण अत्यंत सहानुभूतीने रंगविताना सामाजिक प्रश्नांची चर्चा करून अखेर बोध केला आहे.

### हरिभाऊ आपटे यांच्या कथांची वैशिष्टे /भाषाशैली –

हरिभाऊंची भाषाशैली साधी सरळ आहे. ती अलंकाराने बोजड न होता घरगुती व पात्राच्या स्वभावाशी सुसंगत आहे. त्यांची कथा साधी सोपी आहे. तिला उपदेशाचे वावडे नाही किंवा पाल्हाळाचा कंटाळा नाही. सभोतालच्या बऱ्या वाईट माणसांच्या प्रवृत्तींचे वर्णन करून ती कथा अनिष्ट रूढींवर टीकाही करते. थोडक्यात साधी, घरगुती भाषा, वास्तवचित्रण, उत्कृष्ट स्वभावरेखाटन, चटकदार निवेदन ही हरिभाऊंच्या कथांची लक्षणीय वैशिष्टे म्हणता येतील.

### मासिक मनोरंजन –

मराठी कथेचे बीजारोपन 'करमणूक' साप्ताहिकाने केले मात्र लघुकथेच्या विकासाचे कार्य 'मनोरंजन' मासिकाने केले. **काशिनाथ रघुनाथ मित्र** यांनी हे मासिक १८९५ मध्ये सुरू केले. एखादी गोष्ट, काही सुभाषिते, एखादा छोटासा नीतिपर लेखाचा मजकूर या मासिकात असे. स्त्रियांचे लेख हा स्वतंत्र विभाग १९१०च्या दिवाळी अंकापासून सुरू झाला. मनोरंजनाचे बहुमोल योगदान म्हणजे मराठी कथेला मिळवून दिलेले स्वतंत्र स्थान. प्रारंभीच्या १५ वर्षात मनोरंजनाचे स्वरूप करमणूकमधील गोष्टींसारखे होते. त्यामधून विधवा, त्यांच्या हालापेष्टा, सासूरवास, पुनर्विवाह, दारूचे दुष्परिणाम हे जुनेच विषय हाताळले जात. क्वचित प्रेमभावना चित्रित करणाऱ्या कथा, विनोदी कथा, इंग्रजी रहस्यकथांची भाषांतरेही प्रसिद्ध झालेली दिसतात. मात्र १९१० नंतरच्या मासिक मनोरंजनामधील कथाबोध करण्यापेक्षा मनोरंजनाकडे झुकलेली दिसते. आशय आविष्कारामध्ये वेगळेपणा आला. स्त्रीविषयक दृष्टिकोन बदलून तो अत्यंत व्यापक व विशाल झाला. स्त्रीशिक्षण, स्त्रियांची उन्नती याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन या मासिकाने उदारमतवादी केला. **'यत्र नार्यस्तू पुजन्ते रमन्ते तत्र देवता'** हेच मुळी मनोरंजनाचे ब्रीदवाक्य होते. १९१० ते १९२५ पर्यंत मनोरंजनमधून मराठी कथा अनेक अंगांनी विकसित झाली. म्हणून या कालखंडाला 'मनोरंजन कालखंड' म्हणतात. याचे सर्व श्रेय या मासिकाचे संपादक राहिलेले वि.सी.गुर्जर, ए.पां.रेंदाळकर व श्री. कृ. कोल्हटकर यांना जाते.

### वि.सी.गुर्जर यांचे कथालेखन –

१९१२ ते १९१८ या काळात मासिक मनोरंजनचे संपादक असलेल्या गुर्जरांना या कालखंडातील लघुकथा लोकप्रिय करण्याचे अधिक श्रेय जाते. १९३६ पर्यंत त्यांच्या ६०० च्या वर कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. उदा. घातवार, जगदंबा, पुरूषांची जात, बायकांची जात, लाजाळूचे झाड इत्यादी. त्यांच्या अनेक कथा रचनाकौशल्याच्या दृष्टीने वैशिष्टपूर्ण आहेत.

### कृ. के. गोखले यांचे कथालेखन –

गोखले यांनी करमणूक, मनोरंजन, नवयुग, रत्नाकर, यशवंत या मासिकांतून कथालेखन केले. मनोरंजन करणे हा मुख्य हेतू त्यांच्या कथालेखनामागे होता. इंग्रजी कथांचे मराठी भाषांतर करण्याचे त्यांचे कौशल्यही चांगले होते. त्यांच्या **'खूप केलेत सूनबाई व इतर गोष्टी' (१९११)** या कथासंग्रहात महाराष्ट्रातील समाजाचे चित्रण आले आहे. **'बालक व दोन दिवसांची बायको'** ही हास्यकथा तसेच मैनाबाईचा राघू, मंतरलेले पाणी, थोडासा मेंदूचा विकास अशा काही कथांमधून त्यांचे लेखनकौशल्य प्रकट झाले आहे. त्यांची भाषा सहज सुंदर व नर्मविनोदी असमन मनोरंजन करण्याची कला त्यांना चांगली अवगत होती.

### नारायण हरी आपटे यांचे कथालेखन –

यांनी मध्यमवर्गीय कुटुंबातील जीवनाच्या विविध छटा आपल्या कथांमध्ये रंगवून कौटुंबिक जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. 'बनारसी बोरे, आराम–विराम, हसा किंवा रूसा' या त्यांच्या कथा संग्रहातून सत्याचा विजय व खोटयाचा पराभव करण्याकडे त्यांचा कल सहज दिसून येतो. मध्यमवर्गीय कुटुंबातील वास्तव चित्रण प्रभावीपणे केल्यामुळे त्यांच्या कथा रंजक झालेल्या आहेत. उदा. सुमती, तहानलेला कैदी इ.

### वा.ना.देशपांडे यांचे कथालेखन –

यांच्या 'सुखस्वप्ने व दिपावली' या दोनही कथा संग्रहातील कथा वाचल्या म्हणजे वादविवाद व व्याख्याने कथेच्या उत्कटतेला कशा हानिकारक होतात याची कल्पना येते.

### या कालखंडातील काही स्त्री कथालेखिका –

या काळात स्त्री कथा लेखिकासुद्धा लघुकथेचे दालन समृद्ध करण्यासाठी पुढे सरसावल्या. त्यामध्ये काशीबाई कानेटकर, गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के यांचा समावेश होतो. संसारिक जीवनातील प्रसंग घेऊन ते जिव्हाळयाने रंगवायचे व अधून मधून त्यामध्ये नीतिबोधाचे मिश्रण करायचे असे त्यांच्या कथांचे स्वरूप होते.

### काशीबाई कानिटकर यांचे कथालेखन –

यांच्या 'चांदण्यातील गप्पा, शिळोप्याच्या गोष्टी' या कथासंग्रहातील कथा पाहिल्या तर त्यांची एकंदर प्रवृत्ती, नीतितत्त्वे व धर्मतत्त्वे प्रतिपादन करण्याकडे अधिक कल आहे असे दिसते. दारूचे दुष्परिणाम, अत्युच्च प्रेमाची महती, गरीब माणसाला त्याचे नातेवाईक कसे विसरतात, प्रसंगावधान व चातुर्य यामुळे आलेल्या संकटांना कसे तोंड देता येते इ. विषय त्यांच्या लघुकथेचे असल्याचे दिसते.

### गिरीजाबाई केळकर यांचे कथालेखन –

यांचे 'समाजचित्रे भाग १ व २, केवळ विश्रांतीसाठी' असे तीन कथा संग्रह प्रसिद्ध झाले असून यामध्ये सामाजिक प्रश्नांची चर्चा केली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे येथील कुटुंबव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांची चर्चा त्यांनी आपल्या कथांमधून केली. मात्र रचना कौशल्याच्या अभावामुळे त्यांच्या कथा परिणामकारक झाल्या नाहीत.

### आनंदीबाई शिर्के यांचे कथालेखन –

यांचाही दृष्टिकोन समाजाला नीतिबोध करण्याकडेच आहे. 'बेगम दिल आरा' ही त्यांची गाजलेली कथा आहे. त्यांनी अनेक रहस्यकथा लिहिल्या आहेत.

### समारोप –

अशा प्रकारे सुरूवातीच्या काळात अद्‌भूतरम्य, पौराणिक असणारी मराठी कथा पुढे करमणूक, मनोरंजन, रत्नाकर इ. नियतकालिकांतून ख–या अर्थाने आकाराला आली. निवेदनात साध्या पद्धतीऐवजी कथन पद्धतीचा वापर, संवादातील अवखळपणा, विनोद अशा गुणवैशिष्टयांनी कथा वाङ्मय बहराला आले. १८९० ते १९१० या कालखंडात कथा घडविण्याचे व लोकप्रिय करण्याचे काम हरिभाऊ आपटे यांच्याकडे जाते. त्यांनी कथेला अधिक सामाजिक केले. ते करताना जनसामान्यांच्या परिचित अनुभवांना कलात्मक आविष्कार देण्याचा प्रयत्न केला. पुढे हे काम मनोरंजन मासिकाने केले. या सर्वांमुळे मराठी कथेचा विकास होऊन ती अधिक समृद्ध झाली.